भंडारा जिल्हा पोलीस वार्तापत्र

(सकाळ)

जा.क्र. १३६/माहिती कक्ष/वार्तापत्र
पोलीस अधीक्षक कार्यालय, भंडारा
दिनांक २४/०२/२०१७

१) मुलीचा विनयभंग केल्याने गुन्हा नोंद. :–

दिनांक २३/०२/२०१७ चे ०५.०० वा. दरम्यान. यातील फिर्यादी ही आपले राहते घरी गोठयात झाडु मारीत असतांना यातील नमुद आरोपीने गोठयात येवुन तीला मागेहुन येवुन पकडुन तीचे तोंड दाबुन अश्लिल कृत्य करून विनयभंग केला तसेच वेळोवेळी पाठलाग करून प्रपोज केल्याने फिर्यादीचे तोंडी रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन मोहाडी येथे कलम ३५४ ड, ४५१ भांदवी. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोउपनी. गेडाम पोलीस स्टेशन मोहाडी हे करीत आहेत.

२) अल्पवयीन मुलीला फुस लावुन पळवुन नेल्याने गुन्हा नोंद. :–

दिनांक १४/०२/२०१७ चे ११.०० ते वा. दरम्यान. यातील फिर्यादीची अल्पवयीन पीडीत मुलगी वय १७ वर्ष ३ महीने हिचे सोबत यातील संशयीत आरोपीने प्रेम संबध ठेवुन लग्नाचे आमिष दाखवुन पळवुन नेले आहे. असे फिर्यादीने आज रोजी पो.स्टे. ला येवुन तोंडी रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन साकोली येथे कलम ३६३ भांदवी. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पो.हवा.परशुरामकर पोलीस स्टेशन साकोली हे करीत आहेत.

३)संगनमत करून अश्लिल शब्दात शिविगाळ करून जिवाने मारण्याची धमकी दिल्याने गुन्हा नोंद . . :–

दिनांक २३/०२/२०१७ रोजी १८.०० वा. दर. यातील आरोपीतांनी संगनमत करून फिर्यादीला व फिर्यादीचे सुनेला तुम्ही जादुखोर आहात तुमच्या मुळे माझे वडील मरण पावले असे बोलुन भांडण करून फिर्यादीला अश्लिल शब्दांत शिवीगाळ करून रस्त्यावरील दगड उचलुन जखमी केल्याने व जिवाने मारण्याची धमकी दिल्याने असे फिर्यादीचे तोंडी व डॉ. रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन अडयाळ येथे कलम २९४,५०६,३३६,३२३,३४ भादंवि.सहकलम ३(२),२(१),(ख),६महाराष्ट्र नरबळी अमानुष अनिष्ट अघोरी प्रथा जादुटोना प्रतीबंधक अधिनीयम २०१३ अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला. पुढील तपास पोहवा. जाधव पो.स्टे. अडयाळ हे करीत आहेत.

४) रेतीची चोरी करतांनी वाहतुक परवाना न बाळगता व दंडाची रक्कम न भरता पळुन गेल्याने गुन्हा नोंद :–

दिनांक २२/०२/२०१७ चे २०.०० ते वा. पुर्वी रा. दरम्यान. यातील फिर्यादी गंगाधर दामोधर शिवनकर वय ४० वर्ष, रा. लाखनी हे भरारी पथकासह अवैध गौन खनीज रेती बाबत पेट्रोलींग करित असतांना यातील आरोपी चालकाने आपल्या ताब्यातील ट्रॅक्टर चे ट्रॉली मध्ये १ ब्रास रेती किंमती १०,४००/–रू. ची अवैध रित्या वाहतुक परवाना न बाळगता चोरून नेत असतांनी मिळुन आल्याने त्यास फिर्यादीने दंडाची रक्कम भरण्यास सागीतले असता दंडाची रक्कम न भरता जप्त केलेली रेती रस्त्याचे कडेला खाली करून फिर्यादीस झटका देवुन ट्रॅक्टर चालक व मालक ट्रॅक्टर वर बसुन पळुन गेल्याने व त्यांनी शासकीय कामात अडथळा केला आहे असे फिर्यादीचे लेखी व जप्तीनामा रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन लाखनी येथे कलम ३७९,३५३,३४ भांदवी. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोना. पठाण पोलीस स्टेशन लाखनी हे करीत आहेत.

५) अवैध दारु /जुगार अडयांवर धाडी . :–

दिनांक २३/०२/२०१७ रोजी भंडारा जिल्हा पोलीसांनी पो. स्टे. तुमसर, अडयाळ येथील अवैध दारू/जुगार अडयांवर धाडी घालुन एकुण ०५ गुन्हे दाखल करून आरोपींच्या ताब्यातुन ३५ लिटर हातभट्टी दारु किंमती ३,१५०/–रु. व जुगारातुन किंमती १,४२३ /–रु. असा एकुण ४,५७३/–रु. चा माल जप्त करण्यात आला आहे.

सपोनि. के. एम.हत्तीमारे
जि. वि. शा भंडारा करीता
दुरध्वनी.क्र. ९४२२८३२१७८

प्रति,

जिल्हा माहिती अधिकारी, भंडारा

वर्तमान पत्राचे संपादक व जिल्हा प्रतिनिधी यांना उपरोक्त माहीती दैनिक वर्तमान पत्रात प्रसिध्द करण्याकरीता कळविण्यास विनंती आहे.

प्रत, संगणक कक्ष, भंडारा यांना भंडारा पोलीस संकेतस्थळावर ठेवण्याकरीता.